


## ह्या शिकवणीत तुम्ही उषा जानोम रिबन आणि सीकुईन फुट वापरणे शिकाल.



एकदा ही शिकवणी तुम्ही बघितली आणि शिकवल्याप्रमाणे केलं, तर उषा जानोम सेक्विन फुट वापरून तुम्हीसुद्धा ह्यातील प्रत्येक वस्तू आणि इतरही खूप काही बनवण्यास सुसज्ज व्हाल. तर मग सुरु करूया, चालेल?

ह्या फुटचा वापर करून तुम्ही रिबन्स आणि सेक्विन्स कपड्यांवर शिवू शकता. ह्या फुटमध्ये रिबन्स टाकण्याचे दिशादर्शक अंतर्निहित आहेत जे तुम्हाला शिवतानाच समानतेने रिबन टाकण्यास मदत करतात.

ह्या पाठाकरिता तुम्हाला जे साहित्य आवश्यक असतील ते आहेत उषा जानोम रिबन सेक्विन फुट, एक 6X12 इंचाचा कपड्याचा तुकडा, रिबन, रिक-रॅक लेस, सेक्विन लेस, धागा, मार्कर, फुटपट्टी आणि कात्री.

कपड्याच्या मध्यभागी, लांबीच्या कडेने एक सरळ रेघ ओढण्यापासून सुरुवात करा.

रिबन रेषेवर ठेवा आणि थोडी जादा लांब ठेवून कापून टाका. इतर रिबन्सना कापलेल्या रिबनच्या तुकड्याच्या लांबीएवढे मोजून कापून घ्या.

तुमच्या साध्या प्रेसर फुटच्या जागेवर रिबन सेक्विन फुट तडकून अशाप्रकारे बसवा.
आता कापड फुटवर ठेवा आणि त्याला फुटच्या सरळ रेषेत घ्या. आपण रिबनपासून सुरुवात करूया – रिबनला फुटच्या समोरील फटीतून आत घाला आणि प्रेसर फुट खाली करा.




पुढे, मशीन सेट करण्यासाठी – झिगझॅग स्टीच निवडा, स्टीचची रुंदी 7 करा आणि स्टीचची लांबी 4 करा.

स्टार्ट बटण दाबा आणि रिबन कपड्यावर शिवण्यास सुरुवात करा, सवय होईपर्यंत वेग कमी ठेवा. शिवताना रिबनला जागेवर ठेवण्यासाठी तिला दिशा देत राहा.





कपड्याचा तुकडा बाहेर काढण्यासाठी धागा कापा आणि फुट उचला.

आता रिक-रॅक लेस. तुम्हाला मशीन तयार करण्यासाठी थोडे बदल करावे लागतील – स्टीचला बदलून 1 करा आणि स्टीचची लांबी वाढवून 2.8 करा.



पहिल्याप्रमाणेच कापड फुटखाली ठेवा आणि रिक-रॅक लेस फटीत टाका. फुट खाली करा आणि शिवण्यास सुरुवात करा.

कपड्याचा तुकडा बाहेर काढण्यासाठी धागा कापा आणि फुट उचला. बघा ते किती सोपं होतं आणि हे किती परिणामकारक दिसतं.





आता तुम्हा सर्वांसाठी ज्यांना चमक-दमक आवडते. चला सेक्वुइन्स आणूया. कापड फुटखाली ठेवा आणि सेक्वुइन लेस फटीत टाका.

सेक्वुइन लेस शिवण्यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये एक बदल करावा लागेल – स्टीचची लांबी वाढवून जास्तीत जास्त ठेवावी लागेल.



सेक्वुइन लेस कपड्यावर लावण्यास सुरुवात करा. आता तुम्हाला रिबन सेक्वुइन फुट वापरून तुमची वैयक्तिक शैली कशावरही बिंबवण्याची आणखी एक कला अवगत झालेली आहे.



ह्याचा वापर विविध रिबन्स आणि सेक्रुइन लेस लावून जुन्या कपड्यांचा पुनर्वापर करण्यासाठी करा, सह-साधने बनवा, तुमच्या पिशव्यांना, पुस्तकांना आणि आयुष्याला मोहकता आणि नवीन बाज द्या. एक अभिव्यक्ती तयार करा -- रिबन्स, सेक्रुइन्स आणि इंद्रधनुच्या रंगांनी !